# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com

**डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष - २०१५**


जाक्र/तंत्रशिविकाऔ/शिक्षण/पंदेवसतीगृह/२०१७/२०४

दिनांक :- 16 JAN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित/विना अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,

तंत्रनिकेतने,एचएमसीटी,एम.बी.ए.,एम.सी.ए. पदविका/पदवी /पदव्युत्तर पदवी/

अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थामधील प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्यांनी डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ भरलेल्या अर्जाची तपासणी बाबत...**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र. ५०१/तांशि-०४ दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, वरील संदर्भिय शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह नर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६ साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद येथे करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/तंत्रनिकेतन/डी.फार्मसी/एम.बी.ए/एम.सी.ए.अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शासन निर्णयातील सुचनांप्रमाणे व खालील मार्गदर्शक तत्वानुसार संस्थास्तरावर विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करून फक्त उपरोक्त शासन निर्णयातील नियमाप्रमाणे/सुचना प्रमाणे देय असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास तपासणीसाठी सादर करण्यात यावेत.

**अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे.**

१. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत.
२. मागील वर्षाची उत्तीर्ण गुणपत्रिका,अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, प्रवेश फी, बँक खाते पासबुक छायांकित प्रत.
३. महाराष्ट्र (वादग्रस्त महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रातील विद्यार्थ्याकरिता कर्नाटक) राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, दोन्ही पालकाचे उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार यांनी दिलेले) १० वी, १२ वी पदवी, स्नातक इत्यादी तसेच मागील वर्षी उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका, शिक्षण शुल्क भरल्याची पावती, आधारकार्ड, प्रतिज्ञापत्र, पालकांचे अल्पभुधारक प्रमाणपत्र किंवा नोंदणीकृत कामगार असल्याचे प्रमाणपत्र, वसतीगृहाची पावती/भाडेकरार, भाडेपावती, मालमत्ता कराची पावती जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

Folder 2016-17/Admission

४. सदरील विद्यार्थ्याने केद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमधून कॅप मध्ये प्रवेश घेतलेला असावा, विद्यार्थ्यांच्या अर्जावरती संस्था प्रमुख/पालक/विद्यार्थ्या.

५. वडीलाचे उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक व विभक्त कुटुंब असेल तर घटस्फोटाच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत आवश्यक, वडील हयात नसतील तर वडीलांचे मृत्यू प्रमाणपत्र सादर करावे.

६. अभिमत विद्यापीठांना ही सवतल लागू राहणार नाही.

***शासकीय अभियांत्रिकी पदवी व पदविका संस्थांच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्तरावर एक तीन सदस्यीय समिती नेमून अर्जांची छाननी व तपासणी उपरोक्त अटी व शर्ती नुसार त्यांच्या स्तरावर करावी व तपासणी अहवाल दिनांक २७/०१/२०१७ रोजी या कार्यालयास सादर करावा.**

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह अर्ज तपासणी बाबतचे वेळापत्रक**

| अ.क्र | जिल्हा | दिनांक | तपासणी साठी उपस्थित राहवयाच्या संस्था |
|---|---|---|---|
| १ | जालना/परभणी व हिंगोली | १८.०१.२०१६ | पदविका/पदवी अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी |
| २ | बीड/उस्मानाबाद | १९.०१.२०१६ | पदविका/पदवी अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी |
| ३ | औरंगाबाद | २०.०१.२०१७ व २१.०१.२०१७ | पदविका/पदवी अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी |
| ४ | लातुर | २३.०१.२०१७ व २४.०१.२०१७ | पदविका/पदवी अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी |
| ५ | नांदेड | २५.०१.२०१७ | पदविका/पदवी अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी |

विद्यार्थ्यांनी भरलेल्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना मधील अर्ज तपासणी अंती निघालेल्या कागदपत्राच्या त्रुटीची पुर्तता संस्थांनी दिनांक २८/०१/२०१७ पर्यत करणे बंधनकारक राहिल त्या नंतर त्रुटी पूर्ततेच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. या कार्यालयाकडून दिनांक ३०/०१/२०१७ रोजी सदरील अर्ज ऑनलाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळावर मान्यता देऊन सादर करण्यात येणार आहे. दिनांक २८/०१/२०१७ पर्यत त्रुटीची पुर्तता न केल्यास होणा-या परिणामास संस्था जबाबदार राहिल याची संस्था प्रमुखांनी नोद घ्यावी.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद